शब्दांना सत्याची धार

# प्रहार

RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED

मुंबई ● सोमवार, ५ जून २०२३ | मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक येथून एकाचवेळी प्रसिद्ध ● वर्ष १९ ● अंक २३६ ● पाने १० ● ₹ ५.०० www.prahaar.in epaper.prahaar.in





अंतरंग

'शाहरुखच्या मुलाची चिंता करणाऱ्या ताई पीडित मुलीची भेट घेणार का'?

वरळी कोळीवाड्याचा सुंदर नजारा




# ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचना यांचे निधन

## चित्रपटसृष्टीतील एका पर्वाचा अंत!

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

सहजसुंदर अभिनय, आई-वहिनी, बहिणीचे ममत्व रूपेरी पडद्यावर जिवंत करणाऱ्या, ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचना यांचे रविवारी दादर येथील सुश्रूषा रुग्णालयात निधन झाले. त्या ९४ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात मुलगी, नात-नातजावई असा परिवार आहे. सुलोचनादीदी यांच्या निधनाने मराठी-हिंदी चित्रपटसृष्टीत हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

श्वासोच्छ्वासाचा त्रास आणि वयोमानानुसार इतर आजारांमुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारा दरम्यान, सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीतील एका पर्वाची अखेर झाली असल्याचे म्हटले जात आहे. सुलोचनादीदी यांच्या पार्थिवावर सोमवार, ५ जून रोजी शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यापूर्वी त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी प्रभादेवी येथील निवासस्थानी ठेवण्यात येणार आहे.

सुलोचनादीदी यांनी चित्रपटसृष्टीत दिलेल्या योगदानासाठी १९९९ मध्ये पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात आले होते. त्याशिवाय, २००४ मध्ये फिल्मफेअर जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला. २००९ मध्ये महाराष्ट्र सरकारने 'महाराष्ट्र भूषण' या राज्याच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. बेळगावमध्ये ३० जुलै १९२८ रोजी जन्म झालेल्या सुलोचनादीदी यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीची सुरुवात १९४६ पासून केली. १९४६ ते १९६१ या काळात सासुरवास (१९४६), वहिनीच्या बांगड्या (१९५३), मीठ भाकर, सांगते ऐका (१९५९), लक्ष्मी आली घरा, मोठी माणसे आदी गाजलेल्या मराठी चित्रपटांमध्ये त्यांनी मुख्य अभिनेत्री म्हणून भूमिका साकारली. सुलोचनादीदी यांनी २५० हून अधिक मराठी-हिंदी चित्रपटांमध्ये काम केले आहे.

**ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचनादीदी यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत.**

### हिंदी चित्रपटात विशेष छाप

सुलोचनादीदी यांनी हिंदी चित्रपटसृष्टीतही आपल्या अभिनयाची छाप सोडली. अनेक चित्रपटांमध्ये त्यांनी आईची भूमिका ताकदीने साकारली. एक चरित्र अभिनेत्री म्हणून त्यांनी आपली छाप सोडली. देव आनंद, सुनील दत्त, राजेश खन्ना, अमिताभ बच्चन आदी सुपरस्टार अभिनेत्यांच्या आईची ऑनस्क्रीन भूमिका साकारली होती. देव आनंद यांची भूमिका असलेल्या बऱ्याच चित्रपटात त्यांनी भूमिका साकारल्या आहेत. यामध्ये जब प्यार किसीसे होता है, प्यार मोहब्बत, दुनिया, जॉनी मेरा नाम, अमीर गरीब, वॉरंट आणि जोशिला आदी चित्रपटांचा समावेश आहे. राजेश खन्ना यांच्या दिल दौलत दुनिया, बहरों के सपने, डोली, कटी पतंग, मेरे जीवन साथी, प्रेम नगर, आक्रमन, भोला भला यांचा समावेश आहे. त्याग, आशिक हूँ बहरों का आणि अधिकार आदी चित्रपटांमध्ये त्यांनी भूमिका साकारली होती. तर, हीरा, झुला, एक फूल चार कांटे, सुजाता, मेहरबान, चिराग, भाई बहन, रेश्मा और शेरा आदी चित्रपटांमध्ये त्यांनी सुनील दत्त यांच्यासोबत भूमिका साकारली.

# मान्सून केरळला धडकणार

## मध्य महाराष्ट्रासह मराठवाड्यात सोसाट्याच्या वाऱ्यासह तुरळक पावसाची शक्यता

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

नैऋत्य मान्सून देशाच्या सागरी हद्दीत दाखल झाला असून कोणत्याही वेळेला तो केरळमध्ये पोहोचणार आहे. त्यामुळे भारतीय हवामान विभाग लवकरच त्याचे केरळमध्ये आगमन झाल्याची घोषणा करू शकते. मान्सून सामान्यतः १ जून रोजी केरळमध्ये दाखल होतो. गेल्या वर्षी म्हणजेच २०२२ मध्ये तो २९ मे रोजी केरळमध्ये पोहोचला होता. तर तत्पूर्वी २०२१ मध्ये तो १ जूनला पोहोचला होता. सोमवारपासून केरळमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. नैऋत्य मान्सून सध्या लक्षद्वीप व दक्षिण अरबी समुद्राच्या काही भागांतून पुढे सरकत आहे, अशी माहिती हवामान खात्याकडून वर्तवण्यात येते. रविवारी पुण्यासह नाशिक, नंदूरबार, जळगावसह राज्याच्या काही भागांत वादळीवाऱ्यासह पाऊस झाला.

राजस्थान, छत्तीसगड, ओडिशा, अंदमान व निकोबार बेट समूह, केरळ, कोकण व गोवा, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, किनारपट्टी आंध्र प्रदेश व यानाम, तेलंगणा, रायलसीमा आणि कर्नाटकमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाट, मेघगर्जना व सोसाट्याच्या वाऱ्यासह तुरळक पाऊस होण्याची शक्यता आहे. सोमवारपर्यंत केरळच्या पठानमथिट्टा व इडुक्की जिल्ह्यांमध्येही यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.



### यंदा सरासरी पावसाचा अंदाज

यंदा मान्सून सामान्य राहील, असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. पाऊस सामान्य झाल्यास देशातील अन्नधान्य उत्पादनही सामान्य होईल. म्हणजेच महागाईपासून दिलासा मिळू शकतो. देशातील शेतकरी साधारणतः १ जूनपासून खरीप पिकांची पेरणी सुरू करतात. याच वेळी मान्सून भारतात प्रवेश करतो. पिकांची पेरणी ऑगस्टच्या सुरुवातीपर्यंत सुरू असते.

**देशात मान्सून येण्याचा नियम काय?** : केरळ, लक्षद्वीप व कर्नाटकमध्ये मान्सून आल्याची घोषणा करणाऱ्या ८ स्थानकांवर सलग २ दिवस किमान २.५ मिमी पाऊस झाला की, देशात मान्सून दाखल झाल्याची घोषणा केली जाते.

### ८० टक्के शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून

देशात वर्षभर जेवढा पाऊस पडतो, त्यापैकी ७० टक्के पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यांमुळे पडतो. आजही आपल्या देशातील ७०% ते ८०% शेतकरी सिंचनासाठी पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहेत. या परिस्थितीत त्यांचे उत्पादन पूर्णतः कमी किंवा जास्त पावसावर अवलंबून असते. खराब पावसाळा आला की महागाईही वाढते. भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचा वाटा २०% आहे. त्याच वेळी, कृषी क्षेत्र देशाच्या निम्म्या लोकसंख्येला रोजगार प्रदान करते. चांगला पाऊस म्हणजे निम्म्या लोकसंख्येचे उत्पन्न सणासुदीपूर्वी चांगले होऊ शकते. त्यामुळे त्यांची खर्च करण्याची क्षमताही वाढते.

## वेचक

### समीर वानखेडेंना दाऊदच्या नावाने धमकी

**मुंबई :** एनसीबीचे माजी विभागीय संचालक समीर वानखेडे यांनी आपणास जीवे मारण्याची धमकी येत असल्याचा दावा केला आहे. या प्रकरणी त्यांनी कुख्यात डॉन दाऊद याचे नाव घेतले आहे. खोट्या ट्विटर अकाऊंटवरून त्यांना ही धमकी आल्याची तक्रार मुंबई पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली.

### गुवाहाटीत इंडीगोचे इमर्जन्सी लँडिंग

**गुवाहाटी :** आसाममधील गुवाहाटीमधून दिब्रुगडला जाणाऱ्या इंडिगो विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले. विमानाच्या पायलटने इंजिनमध्ये समस्या असल्याचे जाहीर केल्यानंतर गुवाहाटी येथील गोपीनाथ बोरदोलोई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे वळवण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या फ्लाइटमध्ये केंद्रीय पेट्रोलियम राज्यमंत्री आणि भाजपचे दोन आमदार देखील प्रवास करत होते.

### चिरंजीवींना कॅन्सर झाल्याच्या अफवा

**हैदराबाद :** दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील एक प्रसिद्ध अभिनेता चिरंजीवीविषयी त्याला कॅन्सर झाल्याची चर्चा समाजमाध्यमांवर सुरू झाली होती. मात्र ही गोष्ट चुकीची असल्याची माहिती खुद्द चिरंजीवी यांनी ट्वीट करत दिली.

# वन विभागाने केली ५०० पर्यटकांची सुटका

नितीन शहा

**भंडारदरा :** रविवार अचानक आलेल्या वादळीवारा व मुसळधार पावसामुळे भंडारदरा धरण परिसरातील आशिया खंडातील दोन नंबरची खोल दरी असलेल्या सांधण दरीत अडकलेल्या सुमारे ५०० पर्यटकांना वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी स्थानिक नागरिक व गाईड यांच्या मदतीने सुखरूप बाहेर काढले.

शनिवार, रविवार सुट्टी व भंडारदरा धरण परिसरात सुरू असलेल्या काजवा महोत्सवाचा आनंद उपभोगण्यासाठी सध्या गर्दी होत आहे. यातील काही पर्यटकांनी शनिवारी रात्री काजवा महोत्सवाचा मनमुराद आस्वाद घेऊन रविवारी दुपारी आशिया खंडातील दोन नंबरची खोल दरी असलेल्या सांदन दरीचा फेरफटका मारून आनंद घेण्यासाठी दरीत उतरले व अचानक वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली व पाण्याचा ओघ वाढू लागला. दरम्यान सुमारे ५०० ते ६०० पर्यटक सांदन दरी अडकले आहेत. त्यांनी तत्काळ मदत कार्यासाठी धाव घेतली, असे वन विभागाचे वनसंरक्षक महिंद्रा पाटील, दिवे यांनी सांगितले.

# ओडिशा रेल्वे अपघाताची सीबीआय चौकशी होणार: अश्विनी वैष्णव

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

ओडिशाच्या बालासोरमध्ये एक्स्प्रेस ट्रेनला झालेल्या अपघाताच्या प्रकरणाची चौकशी आधीच सुरू आहे, मात्र आता सीबीआय चौकशीही केली जाईल आणि जो दोषी असेल त्याला शिक्षा करण्यास सरकार मागे-पुढे पाहणार नाही, असे केंद्रीय रेल्वे मंत्र्यांनी रविवारी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

या अपघातामुळे संपूर्ण देशात शोककळा पसरली आहे. भारतीय रेल्वेच्या इतिहासातील हा सर्वात मोठा अपघात असल्याचे बोलले जात आहे. या अपघातात आतापर्यंत २८८ हून अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. याशिवाय १,१०० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. मदत आणि बचाव कार्य पूर्ण झाले आहे, मात्र अजूनही बोगींमध्ये मृतदेह अडकले असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

'पंतप्रधान मोदींनी दिलेल्या सूचनांनुसार काम वेगाने सुरू आहे. काल रात्री ट्रॅकचे काम जवळजवळ पूर्ण झाले. आज एक ट्रॅक पूर्णपणे दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला जाईल. सर्व डबे काढण्यात आले आहेत. मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत' असे रेल्वेमंत्र्यांनी सांगितले.दरम्यान, रेल्वे बोर्डाच्या ऑपरेशन व बिझनेस डेव्हलपमेंट सदस्या जया वर्मा यांनी सांगितले की, सिग्नलमध्ये समस्या होती. कोरोमंडल एक्स्प्रेसचा अपघात झाला, तेव्हा तिचा वेग ताशी १२८ किमी एवढा होता. या धडकेनंतर मालगाडी रुळावरून घसरली नाही. कारण मालगाडीत लोखंड भरलेले होते.


